जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
06 MAY 2024

लोकमत

# व्ही. एन. शिंदे यांचा सत्कार

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : लेखनाची शिस्त आणि वेळेचे व्यवस्थापन या वैशिष्ट्यांच्या बळावरच शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव तथा विज्ञान लेखक डॉ. व्ही. एन. शिंदे यांना लेखन सातत्य टिकविणे शक्य झाले. त्यामुळेच मराठी विज्ञान परिषदेच्या प्रतिष्ठेच्या पुरस्काराचे ते मानकरी ठरले, असे गौरवोद्गार कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी काढले.

मराठी विज्ञान परिषदेतर्फे डॉ. शिंदे यांना सुधाकर उद्धवराव आठले पुरस्कार देऊन गौरविण्यात आल्याने डॉ. व्ही. एन. शिंदे यांचा विद्यापीठ प्रशासनाच्या वतीने कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व ग्रंथभेट देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, डॉ. सरिता ठकार, जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर आदींसह मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपकुलसचिव गजानन पळसे यांनी सूत्रसंचालन केले.